# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पित

## दिनांक ११-०८-२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

दिनांक ११ ऑगस्ट २०१८ रोजी (का.प.क्र.१७) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११:४५ वा वंदेमातरम् गीताने सुरू झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव, श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| १०. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १३. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १४. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १५. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| १६. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| १७. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| १८. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| १९. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २०. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| २१. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| २२. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| २३. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| २४. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| २५. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| २६. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| २७. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |

| | |
|---|---|
| २८. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| २९. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ३०. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ३१. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ३२. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ३३. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ३४. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ३५. | स.स.श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ३६. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ३७. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ३८. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ३९. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ४०. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ४१. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ४२. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ४३. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ४४. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ४५. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ४६. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ४७. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ४८. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ४९. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ५०. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |
| ५१. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ५२. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ५३. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ५४. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ५५. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ५६. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ५७. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ५८. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ५९. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ६०. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ६१. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |

**नामनिर्देशित पालिका  सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव

२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम

श्री. रेणुकादास वैद्य :मा.सभागृह नेता श्री.विकासजी जैन यांचा आज वाढदिवस आहे. त्यांना पुढील वाटचालीसाठी आणि आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात याव्यात. त्यांनी अतिशय चांगले काम केलेले आहे.

(यास स.श्री.भगवान घडमोडे, श्री.भाऊसाहेब जगताप, श्रीमती सिमा खरात, श्री.विजय औताडे श्री.आत्माराम पवार, श्री.गजानन मनगटे, श्रीमती शिल्पाराणी वाडकर, श्रीमती ज्योती पिंजरकर यांनी अनुमोदन दिले.)

मा.महापौर :स.सभागृह नेता श्री.विकास जैन यांना त्यांचे वाढदिवस निमित्ताने सभागृहाच्या वतीने त्यांना पुढील वाटचालीसाठी त्यांचे पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात येते.

(या वेळी मा.सभागृह नेता श्री.विकासजी जैन यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून सभागृहाच्या वतीने पुढील वाटचालीसाठी तसेच आयुष्यासाठी सुभेच्छा देण्यात आल्या. यानंतर मा.सभागृह नेता श्री.विकासजी जैन यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले.)

श्री.भाऊसाहेब जगताप :मनपातील कर्मचारी श्री.विष्णू ओळेकर यांचे नुकतेच निधन झाले तसेच मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून काल श्री.कारभारी दादाराव शेळके यांनी आत्महत्या केली त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :जो ठराव मांडला त्यास अनुमोदन आहे. ज्या पध्दतीने स्व.काकासाहेब शिंदे व इतर असतील त्यांना आर्थीक मदत केली त्याप्रमाणे कारभारी शेळके यांनाही आर्थीक मदत करावी. स्व.काकासाहेब शिंदे यांना मदत करणार होतो त्या बाबतीत काय झाले?

श्रीमती माधुरी देशमुख :देशाच्या सिमेवर दहशतवादी हल्ला झाला. त्यात शहीद कौस्तुभ राणे व इतर जे शहीद झाले त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी व पाकीस्तानने जो भ्याड हल्ला केला त्यांना निषेध नोंदवावा.

श्री.अय्युब जहागीरदार :वार्ड क्र.४५ च्या सदस्या श्रीमती नसीम बी सांडू खॉ यांच्या मुलाचे निधन झाले त्यासही श्रध्दांजली अर्पण करावी.

(यास श्री.राजगौरव वानखेडे,श्रीमती अंकिता विधाते,श्री.भगवान घडमोडे, श्रीमती कमल नरोटे, श्री.अब्दुल नाईकवाडी,श्री.विकास जैन तसेच उपमहापौर श्री.विजय औताडे यांनी अनुमोदन दिले.)

मा.महापौर :ठिक आहे श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी उभे रहावे.

(या वेळी स्व.विष्णू ओळेकर, श्री.कारभारी शेळके,श्री.गफूर खान सांडू खॉ, शहीद स्व.कौस्तुभ राणे इतर जवान शहीद झाले या सर्वांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

मा.उपमहापौर :मनपाचे कर्मचारी स्व.विष्णू ओळेकर यांचे अचानक निधन झाले. त्यांचे कूटूंबीयांना आवश्यक ती मदत करावी. तसेच मराठा आरक्षण मिळावे यासाठी कारभारी शेळके यांनी आत्महत्या केली त्यांचे कुटूंबीयांना तसेच श्री.गफूर खान सांडू खान यांचे कूटंबीयांना मदत करावी.

मा.महापौर :स्व.कारभारी शेळके यांचे कुटूंबीयांना सुध्दा स्व.काकासाहेब शिंदे, स्व.प्रमोद पाटील इतरांना जी मदत दिली त्याप्रमाणे द्यावी. तसा ठराव मंजूर करण्यात येतो तसेच मनपाचे कर्मचारी श्री.विष्णू ओळेकर यांचेही अचानक निधन झाले, त्यांनाही नियमानुसार जी मदत करता येईल ती मदत करावी. त्यांचे कुटूंबीयांची मुख्यलेखाधिकारी यांनी भेट घेऊन कार्यवाही करावी. तसेच स्व.चेतन चोपडे यांचेही कुटूंबीयांना मदत करावी स्व.काकासाहेब शिंदे यांचे कुटूबींयाना मदत

करावी. तसेच स्व.कारभारी शेळके यांचे कूटूंबीयांनाही १० लक्ष रुपये देण्यात यावे. तसा ठराव मंजूर करण्यात येतो. तसेच स्व.प्रमोद पाटील यांचे कूटंबींयाना मदत करावी. १७ तारखेला मदत देण्यात येईल.

(विषय क्र.५५१ समांतर जलवाहिनी पुनरुज्जीवन योजना कार्यवान्वित करण्या संदर्भातील विषयावर चर्चा)

मा.महापौर :समांतर जलवाहिनी या विषयावर तीनदा सभा तहकूब केली. इतर विषयावर आता चर्चा करू नये. मा.आयुक्त ११,१२,१३ तारखेपर्यंत येथे नाही. दिल्ली येथे स्मार्ट सिटीच्या बैठकीच्या संदर्भात गेलेले आहे. उपमहापौर यांनी सुध्दा पत्र देऊन ही सभा पूढे ढकलावी असे कळविले आहे. (पत्र वाचन करून दाखवितात.)

श्री.राजेंद्र जंजाळ :मा.आयुक्त जोपर्यंत या सभेला उपस्थित राहणार नाही तो पर्यंत सभा तहकूब करावी. तत्कालीन आयुक्त श्री.बकोरीया यांनी जे मुद्दे काढून समांतर योजना त्यावेळी रद्द केली होती त्यावर आताच्या आयुक्तांनी काय तोडगा काढला त्यांचे मत घेणे आवश्यक आहे. मा.आयुक्त उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्या वेळीच ही सभा घ्यावी.

श्री.त्र्यंबक तुपे :मा.आयुक्तांनी प्रस्ताव दिला तत्कालीन आयुक्त श्री.बकोरीया यांनी त्यावेळी मांडलेली भुमिका व त्यानुसार एकमताने ठराव मंजूर केला होता. मा.आयुक्त या सभेसाठी असणे आवश्यक आहे त्यावेळीच ही सभा घ्यावी. महापौर म्हणून या प्रस्तावाच्या विषयी आपली भुमिका काय आहे? ते स्पष्ट करावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :आज सभेला मा.आयुक्त उपस्थित नाही सभा तहकूब करावी. या योजनेसाठी आऊट ऑफ कोर्ट बाहेर सेटलमेंन्ट करू शकणार नाही असे पेपरला आले त्याचे पत्र काय आहे? ते सांगावे.

श्री.नासेर सिद्दीकी :आऊट ऑफ कोर्ट सेटलमेंट करू शकत नाही, असे म्हटले. माझे मते हा प्रस्ताव रद्द करावा. मा.आयुक्त येथे नाही सभा तहकूब करावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :मा.आयुक्त सभेला असतील तेव्हा सभा घ्यावी.

श्री.गजानन बारवाल :आयुक्त साहेब बैठकीला नाही सभा तहकूब करावी.

श्री.जमीर कादरी :मा.आयुक्त येथे नाही सभा तहकूब करावी.

श्री.विकास जैन :मा.उपमहापौर यांनी सभा पूढे ढकलावी म्हणून पत्र दिले. मा.आयुक्त उपस्थित असतील तेंव्हा सभा घ्यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :जो पर्यंत आयुक्त साहेब येत नाही तोपर्यंत ही सभा तहकूब करावी.

श्रीमती माधुरी देशमुख :जे मत सदस्यांनी व्यक्त केले त्यास सहमत आहे.

श्रीमती सरवत बेगम :सभेला मा.आयुक्त उपस्थित नाही सभा तहकूब करावी.

मा.आयुक्त :आज मा.आयुक्त सभेला उपस्थित नाही. सर्व गटनेते व काही सदस्यांनी मत व्यक्त केले की, ही सभा तहकूब करावी त्यानुसार आता ही सभा १७ तारखेला आयोजीत केली जाईल.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित/-
महापौर
महानगरपालिका औरंगाबाद